सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, शहापूर याचे कार्यालय

# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, शहापूर याचे कार्यालय

सहकार भवन, पंडित गुरुजी मार्ग, शहापूर, जि.ठाणे

Email id:- [illegible]@gmail.com कार्यालयाचा दुरध्वनी ०२५२७-२७०२७०

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७७(अ)चा ब (१) अन्वये आदेश

जा.क्र.समिति/बीर/७७(अ)/साकडबाव आदी/६२२/२०१८
दिनांक - ०२/०१/२०१८

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७७ (अ) व नियम १९६१
२) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४
३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)(१)(१-अ)(ब-१)
४) साकडबाव आदी.वि.का. संस्थेचे दिनांक २७/११/२०१७ चे पत्र

ज्याअर्थी साकडबाव आदीवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, मर्या., साकडबाव, ता.शहापूर, जि.ठाणे हि संस्था (जिचा यापुढे उक्त 'संस्था' असा उल्लेख केला आहे) या कार्यालयाकडील नोंदणी क्र.टिएनए/शहापूर/ आरएसआर/आर.एस./४०९/१९९० दिनांक २०/१२/१९९० नुसार नोदणीकृत सहकारी संस्था आहे व संस्थेचे कार्यक्षेत्र या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणे.

ज्याअर्थी संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ महाराष्ट्र सहकारी समिती निवडणूक(नियम २०१४) / संस्थेची मंजूर उपविधी प्रमाणे सुरु राहणे आवश्यक आहे, आणि

ज्याअर्थी साकडबाव आदीवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, मर्या., साकडबाव, ता.शहापूर, जि.ठाणे या संस्थेच्या वाचावे क्र. ०४ अन्वये या कार्यालयास पत्र देवून संस्थेचे संचालक श्री हिरामण दळवी यांना व्यस्कायमुळे यांनी राजीनामा दिल्याचे निदर्शनास आणले आहे. आणि

ज्याअर्थी संस्थेचे संचालक व चेअरमन श्री जानु माकू शिंगे यांनी दि.६.११.१७ चे पत्राने चेअरमन पद व संचालकाचा राजीनामा दिल्याचे पत्र या कार्यालयात दिलेले आहे.

ज्याअर्थी संस्थेच्या व्यवस्थापन समितीत एकुण १३ संचालक पदे असून कोरम ७ सदस्यांचा आहे व सद्यस्थितीत समितीत एकुण ७ सदस्य होते व ६ जागा रिक्त होत्या त्यापैकी श्री दळवी व श्री शिंगे यांचे राजीनाम्यामुळे विद्यमान संचालक मंडळ हे अल्पमतात येवून संस्थेच्या व्यवस्थापनमध्ये पोकळी निर्माण झालेली आहे. व कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यांची तरतूद आहे. सहकार खात्याच्या त्या त्या अनुषंगाने वेळोवेळी प्रसिध्द होणारी परिपत्रके / न्याई आदेश परत्वे कामकाज करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ(ब-१) अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक झाल्याची माझी खात्री झाली आहे.व कलम ७७ अ (१).फ (दोन) नुसार नोटीस प्रसिध्द करणे आवश्यक नसल्याचे मत झाले आहे.

त्याअर्थी मी पुढील आदेश निर्गमित करीत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७७(अ)(ब-१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये नुसार मी, [illegible], सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, शहापूर, जि.ठाणे असा आदेश देत आहे की, साकडबाव आदीवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, मर्या., साकडबाव, ता.शहापूर,, जि.ठाणे या संस्थेच्या संचालक मंडळ अल्पमतात आले असल्यामुळे सदर संस्थेवर त्यांच्या ऐवजी श्री संजय कौ. ठाकरे, मुख्यलिपीक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे.

Scanned by CamScanner

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या पदभार, दप्तराचा व मालमत्तेचा ताबा माजी संचालक मंडळ यांचे कडून घेऊन ६ महिन्यांच्या आंत नविन समितीची रचना करण्याच्या दृष्टीने आणि नवीन समितीला कायदेशिरीत्या निवडून आणून अधिकार पदग्रहण करण्याचा दृष्टीने व्यवस्था करावी.

सदरचा हा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक ०२/०१/२०१८ रोजी निर्गमित करीत आहे.

ठिकाण - शहापूर

दिनांक - ०२/०१/२०१८

(चिंतामण भोये)

सहाय्यक निबंधक

सहकारी संस्था, शहापूर, जि.ठाणे

प्रत,

१) माजी अध्यक्ष /व्यवस्थापक,
साकडबाव आदीवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, मर्या., साकडबाव, ता.शहापूर, जि.ठाणे
२/- त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी त्याच्या कडील आलेल्या संस्थेच्या दप्तराचा ताबा, मालमत्तेचा ताबा, त्वरीत विना विलंब प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करावा व तसे केल्या बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) श्री संजय कौ. ठाकरे, प्राधिकृत अधिकारी, तथा मुख्यलिपीक,साकडबाव आदीवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, मर्या., साकडबाव, ता.शहापूर, जि.ठाणे
२/- त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संस्थेच्या माजी चेअरमन / संचालक मंडळ याचेकडून सर्व दप्तराचा ताबा, मालमत्तेचा ताबा, त्वरीत विना विलंब घेऊन तसे केल्या बाबतचा अहवाल या कार्यालयास
सादर करावा.

३) सर्व संचालक,श्री /श्रीमती ------------------------------------------------------------
साकडबाव आदीवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, मर्या., साकडबाव, ता.शहापूर,, जि.ठाणे

४) व्यवस्थापक,श्री संजय पांढरे,प्रभारी
२/- त्यांना सुचित करण्यांत येते की, त्यांनी सदर आदेशाची प्रत संबंधीत संचालकांना बजावून पोहोच या कार्यालयास सादर करावी.

५) शाखा अधिकारी, दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा - डोळखांब / साकडबाव
२/- त्यांना सुचित करण्यांत येते की, त्यांनी संस्थेचे खाते प्राधिकृत अधिकारी यांचे सहीनेच बँक खात्यातून व्यवहार करणेस अनुमती द्यावी.

६) मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे यांना माहितीसाठी सविनय सादर

७) मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, ठाणे यांना माहितीसाठी सविनय सादर

८) मा.मुख्यकार्यकारी अधिकारी, दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि-ठाणे

९) संग्रह.

सहाय्यक निबंधक

सहकारी संस्था, शहापूर, जि.ठाणे

Scanned by CamScanner